सत्यमेव जयते

**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे – विभागीय कार्यालय, नाशिक**

**(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)**

पत्ता : बॅरक नं. ८, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड, नाशिक - ४२२१०१.

सारथी

ई-मेल : divnashiksarthi@gmail.com दूरध्वनी क्र. : ०२५३-२९९३६८९


जा. क्र. सारथी/ मामुव/ २०२४/८०७ दि. २३/०९/२०२४

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संचालक
छत्रपती शाहू महाराज संशोधन,
प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे

**विषय : मातोश्री मुलींचे वसतिगृह, नाशिक येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत विद्यार्थीनींच्या प्रवेश प्रक्रियेच्या मुदतवाढीबाबत.**

संदर्भ : १) सारथी पुणे संकेतस्थळावर दि. ०६/०८/२०२४ रोजीची प्रसिद्ध जाहिरात.
२) सारथी पुणे संकेतस्थळावर दि. २३/०८/२०२४ रोजीची प्रसिद्ध मुदतवाढ जाहिरात.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करणेत येते की, शैक्षणिक वर्ष सन 2024-25 या वर्षाकरीता मातोश्री मुलींचे वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथील विद्यार्थिनीच्या वसतिगृह प्रवेशासाठी संदर्भ क्र. एक अन्वये सारथी आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत जाहिरात सारथी मुख्य कार्यालय, पुणे https://sarthi-maharashtragov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली होती.

उपरोक्त संदर्भ क्र. एक व दोनला अनुसरुन अदयापपावेतो पूर्णत: प्रतिसाद मिळालेला नाही. सदयस्थितीत उच्च व तंत्र शिक्षण अंतर्गत ५ विदयार्थिनीं प्रवेशीत असून संदर्भ क्र. एक व दोन अन्वये एकण ३४ अर्ज भौतिक स्वरुपात प्राप्त झालेले आहेत. सारथी अंतर्गत रिक्त जागा विचारात घेता पुरेसे अर्ज प्राप्त झालेले आहेत. महाज्योती अंतर्गत विदयार्थिनी प्रवेशासाठी महाज्योती अंतर्गत त्यांचे स्तरावर जाहिरात प्रसिध्द करणेत येत आहे.

**उपरोक्त बाबी विचारात घेता आता फक्त उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत रिक्त जागांसाठी मुदतावाढ जाहिरात सोबत जोडली असून ती प्रसिध्द होणेस विनंती. <u>तसेच Cast Category टॅब मध्ये फक्त उच्च व तंत्र शिक्षण पर्याय (option) उपलब्ध करावा, सारथी व महाज्योती Caste Category टॅब बंद ठेवावा, म्हणजेच उपलब्ध करुन देणेत येऊ नये ही विनंती.</u>**

23-9-2024

**(सुधीर खांदे)**
**उपव्यवस्थापकीय संचालक,**
**सारथी, विभागीय कार्यालय, नाशिक**

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :

१) विभागीय सह संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, पुणे.
२) विभागीय सह संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, नाशिक.

**जिल्हाधिकारी, नाशिक व छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जाहिरात**

## मुदतवाढ जाहिरात

## ( उच्च व तंत्र विभाग )

शासन निर्णय क्रमांक : वसति ५३१७ /प्र.क्र.९/मशि-२ दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक, येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यामार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा लक्षित गटातील ७५ मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग गटातील ७५ मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींसाठी अशाप्रकारे लक्षित घटकातील एकूण २०० विद्यार्थीनींसाठी वसतिगृह सुरू करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ या वर्षाकरीता मातोश्री मुलींचे वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथील विद्यार्थीनींच्या वसतिगृहसाठी प्रवेशाची जाहिरात सारथी मुख्य कार्यालय, पुणे यांचे संकेतस्थळावर दि. ०६/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आली होती. तद्नंतर दि. १२/०९/२०२४ पर्यंत मुदतवाढ देणेत आली होती . अद्याप पावेतो वसतिगृहातील रिक्त जागा पूर्ण क्षमतेने न भरल्यामुळे व पूर्ण क्षमतेने अर्ज प्राप्त न झाल्यामूळे, आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण ऑनलाईन अर्ज करणेसाठी दि. ०१/१०/२०२४ पावेतो पुन:श्च मुदतवाढ देणेत येत आहे. रिक्त जागांच्या प्रवेशाकरीता अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या (अपवाद पदविका परीक्षा उत्तीर्ण होऊन पदविसाठी प्रवेश घेतलेल्या द्वितीय वर्षाच्या) विद्यार्थिनींसाठी खालील प्रमाणे रिक्त जागांच्या तपशीलानुसार जाहिरात प्रसिध्द करणेत येत असून सदर संख्या ही कमी-जास्त होऊ शकेल.

**मातोश्री शासकीय २०० मुलींचे वसतिगृहामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभाग अभ्यासक्रमनिहाय प्रवेशासाठीची संख्या खालीलप्रमाणे राहिल.**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | उच्च व तंत्र शिक्षण विभाग मार्फत वसतिगृहासाठी मुलींची संख्या : ५० |
|---|---|---|
| १ | व्यवसायिक पदवी | उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्राप्त निर्देशानुसार ही ५० विद्यार्थिनींची अभ्यासक्रमनिहाय विगतवारी यादी निश्चित करण्यात येईल. |
| २ | बिगर व्यवसायिक पदवी | |
| ३ | पदव्युत्तर पदवी | |
| ४ | प्रत्यक्ष प्रवेश निश्चित | ०५ |
| ५ | रिक्त जागा | ४५ |

**<u>सदर पदांना आरक्षणाचे प्रचलित शासन धोरण लागू राहील.</u>**

सारथी व उच्च व तंत्र शिक्षण विभागातील विद्यार्थिनींच्या प्रवेशासाठीचे आवश्यक निकष, अटी व शर्ती संकेतस्थळावर उपलब्ध असून अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दि. ०१/१०/२०२४ पर्यंत राहील.

**<u>सारथी विभागीय कार्यालय</u>**

पत्ता – बॅरेक क्र. ८, विभागीय आयुक्त कार्यालय आवार नाशिकरोड, नाशिक, पिन कोड – ४२२ १०१.
संपर्क : फोन नं- ०२५३-२९९३६८९
ई-मेल : divnashiksarthi@gmail.com.
संकेतस्थळ : https://sarthi- maharashtragov.in/

सदरची जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून व त्यासोबत आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकित करून पोस्टाद्वारे / प्रत्यक्ष सारथी संस्थेचे नाशिक येथील वरील पत्यावर दिनांक ०३/१०/२०२४ पावेतो भौतिक स्वरुपात सादर करावेत.

<u>टीप :</u>

१. वसतिगृह लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी शासनाच्या इतर वसतिगृहाच्या योजनेचा दुहेरी आर्थिक लाभ घेतलेला नसावा.
२. वसतिगृहात प्रवेश देण्यात येणाऱ्या पात्र मुलींची यादी सबंधित उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी कागदपत्रांची पडताळणी करुन अंतिम केल्यानंतर उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
३. पात्र विद्यार्थिनींना वसतिगृहात प्रत्यक्ष दाखल (हजर) होण्याचा दिनांक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

**उपरोक्त प्रवेशाच्या जागा व धोरणांमध्ये वेळोवेळी आवश्यक बदल करणेचा अधिकार हा राखून ठेवलेला आहे.**

दि. २३/०९/२०२४
ठिकाण : नाशिक

23-9-2024
(सुधीर खांदे)
उपव्यवस्थापकीय संचालक,
सारथी, विभागीय कार्यालय, नाशिक.